## कोराडी प्रशिक्षण केंद्रातील अभियंत्यांच्या के- ४९, के- ५० व के- ५१ बॅचला श्री जयंत मुळे यांचे मार्गदर्शन

कोराडी प्रशिक्षण केंद्रामध्ये दि. १०.०७.२००९ ला मुख्यालयातील मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री जयंत मुळे यांनी भेट दिली. प्रशिक्षणासाठी असलेल्या के -४९, के- ५० व के ५१ बॅच च्या अभियंत्याशी हितगुज करतांना व त्यांना संबोधित करतांना कोराडी प्रशिक्षण केंद्राचे महाव्यवस्थापक श्री लक्ष्मीकांत कडाव यांनी महाजेनको मध्ये नविन भरती झालेल्या प्रत्येकाला या संस्थेसाठी कार्य करतांना नवनविन व प्रगत कार्यपध्दतीचा वापर कामात आणणे आवश्यक असल्याचे सांगितले.

महाजेनकोच्या मानव संसाधन विभागाच्या मुख्य महाव्यवस्थापक पदी असलेले श्री जयंत मुळे यांनी प्रशिक्षणार्थी सोबत संवाद साधला. महाजेनको मध्ये मुख्य काम हे तांत्रिक स्वरुपाचे असून या कामात गुंतलेल्या सर्व इंजिनिअर्स, तंत्रज्ञ, अधिकारी व तांत्रिक कर्मचारी यांना पुढील काळात वीज व्यापार क्षेत्रात चढाओढीचा सामना करावा लागणार असून त्यासाठी ज्ञानार्जन किती महत्वाचे आहे हे त्यांनी विषद केले.

या कार्यक्रमाचे संचालन कोराडी प्रशिक्षण केंद्राचे श्री ए.आर. सावजी ,कार्यकारी अभियंता यांनी केले.

## पारस प्रकल्प २५० मे.वॅ. संच क्र. ४ “हायड्रॉलिक टेस्ट” यशस्वी

पारस विस्तारीत प्रकल्पाच्या २५० मे.वॅ. संच क्र. ४ च्या बॉयलरची नॉन ड्रेनेबल हायड्रॉलिक टेस्ट २७४ के.जी. प्रेशरवर बॉयलर इन्स्पेक्टर महाराष्ट्र शासन श्री. डी. के. लोंढे नागपूर यांच्या प्रमुख उपस्थितीत यशस्वी पार पाडली. सर्वप्रथम श्री. लोंढे आणि प्रकल्प महाव्यवस्थापक श्री. अनिल नंदनवार यांनी पुजा केली आणि टेस्टला सुरुवात झाली. प्रेशर मीटर डायलचा काटा जसजसा पुढे सरकत होता, तस तशी सर्वाची उत्सुकता शिगेला पोहोचत होती. प्रेशर मीटरच्या डायलचा काटा २७४ के.जी वर जाताच सर्व अधिकारी आणि कामगारांनी टाळ्यांचा कडकडाट केला. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर श्रमाचे चिज झाल्याचा आनंद ओसंडत होता. प्रकल्प महाव्यवस्थापक श्री. अनिल नंदनवार यांनी सर्वाचे अभिनंदन केले. या प्रसंगी भेलचे श्री.भारशंकर, श्री.मंडल, श्री.जाधव,प्रकल्पाचे अधीक्षक अभियंता श्री.सिध्दार्थ तारे, बॉयलरचे कार्यकारी अभियंता श्री.हिवाळे, सुनिल हायटेकचे श्री.प्रसाद, श्री.बेरा आणि कामगार बंधु उपस्थित होते.

## नि:शुल्क बालरोग निदान शिबीर

कोराडी औष्णिक वीज केंद्राच्या दवाखान्यात जून महिन्यात नि:शुल्क बालरोग निदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. वैद्यकीय अधीक्षक डॉ.विजयकुमार वंजारी यांच्या समन्वयाने आणि डॉ.रिषी एस.लोडाया यांच्या सौजन्याने या शिबीराचे आयोजन करण्यात आले.

या शिबीरात बालकांची तपासणी करण्यात आली.या शिबीरामध्ये डॉ.लोडाया यांनी नवीन लसीविषयी माहिती दिली. त्यात हिपाटाईटीस ए. आणि बी,टॉयफाईड व बाळाच्या आहाराविषयी डॉ.लोडाया यांनी उपस्थितांना माहिती देवून औषधोपचार केला.

या शिबीराला डॉ.लोडाया यांचे स्टाफचे तसेच कोराडी औष्णिक वीज केंद्राच्या हॉस्पिटलच्या स्टाफचे मोलाचे सहकार्य लाभले असून आतापर्यंत निरनिराळया आजारा करिता ५० शिबीरांचे आयोजन वैद्यकिय अधीक्षक डॉ.वंजारी यांच्या सौज्न्याने यशस्वीपणे संपन्न झाले आहे.कोराडी वीज केंद्राचे मुख्य महाव्यवस्थापक श्री.ज्ञानेश्वर थुटूरकर यांचे मार्गदर्शनाखाली शिबीराचे आयोजन करण्यात आले.

## खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र येथे जागतिक पर्यावरण दिवस साजरा

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र येथे जागतिक पर्यावरण दिवस दि. ५ जून २००९ रोजी साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला उपस्थित निरीचे माजी उपसंचालक डॉ. जी. एच्. पंड्या, यांनी पाण्याचे नियोजन व निर्सगातील घटकांचा वापर तसेच घरातील लहानसहान वस्तुपासून तर जागतिक पर्यावरणीय बदल व त्यावरील उपायाबद्दल बहुमूल्य मार्गदर्शन केले. जलप्रकिया विभागातर्फे आयोजित औष्णिक विद्युत केंद्राचे महाव्यवस्थापक श्री. डी. डब्ल्यु. पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात पर्यावरणाचे संतुलन कसे राखावे याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ डॉ. एच. डी. वासनिक यांनी सादर केले. या प्रसंगी सर्व उपस्थितांनी पर्यावरण संतुलनाकरिता प्रतिज्ञा घेतली, तर पर्यावरण प्रतिज्ञा वाचन डॉ. एस. के. कांबळे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन श्री. विजय अढाऊ यांनी केले आणि आभार प्रदर्शन डॉ. डी. एम. वैरागडे यांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजनात श्री. पी. डी. पाटील, श्री. वाकेकर, श्री. गिते, श्री. सातपुते, श्री. बेलेकर आदींचा सहभाग होता.